आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१३ मार्च २०२५ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- राज्यात होळीच्या सणाचा उत्साह, विविध भागात पारंपरिक पद्धतीनं सण साजरा करण्याकडे कल
- मे महिन्यात मुंबईत होणाऱ्या वेव्हज परिषदेसाठी केंद्र आणि राज्य सरकारमध्ये सामंजस्य करार
- फास्ट टॅग सक्तीच्या राज्य सरकारच्या निर्णयात हस्तक्षेप करायला मुंबई उच्च न्यायालयाचा नकार
- शनिवारपासून गाय आणि म्हशीच्या दुधात लिटरमागे २ रुपयांची वाढ

**आणि**

- महिलांच्या प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आज मुंबई इंडियन्स संघाचा सामना गुजरात जायन्ट्स बरोबर होणार

<><><><><>

राज्यात आज सर्वत्र होलिकादहन होत आहे. आज होळी पोर्णिमेनिमित्त संध्याकाळी सर्वत्र होलिका दहन केलं जाणार आहे. होलिका मातेला पुरणपोळीचा नैवेद्य दाखवून अनिष्टाचा नाश करण्याची प्रार्थना होलिकादहनाच्या वेळी करण्याचा प्रघात आहे. होलिका दहनासाठी पर्यावरणाची हानी न करणारं साहित्य वापरण्याची दक्षता राज्यातल्या अनेक मंडळांकडून घेतली जात आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी देशवासीयांना होळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. ही होळी देशवासीयांमध्ये एकता आणि बंधूभावाचा रंग मिसळेल असं त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही होळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. होळीचा सण देशवासीयांच्या जीवनात आनंद आणि उत्साह निर्माण करणारा आहे असं त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

हा सण साजरा करताना पर्यावरण रक्षणाबाबत जागरूक राहावं, असं आवाहन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी सर्व नागरिकांना केलं आहे.

होलिकापूजनाच्या निमित्तानं असत्य, अधर्म आणि अहंकाराचं दहन करून, सत्य, न्याय आणि सदाचारानं नवसृजन करूया, अश्या शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही नागरिकांना होळी निमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

कोकणात शिमगोत्सवाला सुरू असून अनेक गावात स्थानिक दैवतांच्या पालख्या निघाल्या आहेत. कोकणातल्या लहान लहान गावांमध्येही ग्रामदेवतेसमोरच्या पटांगणात होलिकादहन करण्याची प्रथा आहे. या शिमगोत्सवासाठी चाकरमानी आपापल्या गावी गेले आहेत. मुंबईतही आज विविध ठिकाणी होलिकादहन होणार असून पर्यावरणाची काळजी घेऊन होलिकादहन करण्याचं आवाहन पालिकेनं केलं आहे.

धुळे जिल्ह्यात आज ५४२ ठिकाणी होळी पेटणार असून त्यासाठी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. धुळे शहरात होळी आणि धुलीवंदन साजरी करण्यासाठी रंग आणि डोलची विक्रीच्या दुकानांनी बाजारपेठही गजबजली आहे.

देशभर प्रसिद्ध असलेल्या भटक्यांच्या पंढरी म्हणून ओळखणाऱ्या मढीच्या यात्रेला आज सुरुवात झाली. मंदिराच्या कळसाला नाथांची काठी लावून हा यात्रा उत्सव सुरू होतो.

खंडेराव महाराज मंदिरात फुलांची आणि भंडार्याची उधळण करीत भाविकांनी होळी रंगोत्सव साजरा करण्यात आला.

धुळे शहरातल्या काँग्रेस भवनात आज भ्रष्टाचार, बेरोजगारी, पालिकेचा कर आणि गॅसच्या वाढलेल्या किंमती विरोधात प्रतिकात्मक होलिकादहन करण्यात आलं.

परभणीत आज स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीनं शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती आणि शक्तिपीठ महामार्ग रद्द करावा, या मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालय समोर सरकारच्या शेती विरोधी धोरणाची होळी करण्यात आली.

**<><><><><>**

राज्यात सर्वत्र आज होलिका दहन होणार असलं तरी भंडारा जिल्ह्यातल्या गवराळा गावात मात्र होळी साजरी केली जात नाही. त्याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

## होल्ड - व्हॉईस कास्ट….

*राज्यात आज ठिकठिकाणी होलिका दहन करण्यात येईल. मात्र, भंडारा जिल्ह्यात लाखांदूर तालुक्यामध्ये गवराळा गावातले ग्रामस्थ मात्र गेल्या ३३ वर्षांपासून होळी पेटवत नाहीत आणि रंगांची उधळणही करत नाहीत. गवराळा वासियांसाठी हा सण भक्तिच्या रंगात रंगून साजरा होतो. कारण, या गावात काही काळापूर्वी किसनबाबा अवसरे महाराज यांचं वास्तव्य होतं. ते मूळचे चंद्रपूर जिल्ह्यातले बेलगावचे रहिवासी होते. पण, ते गवराळा गावातल्या हनुमान मंदिरात राहत. त्यांनी श्रमदानातून*

*स्वच्छता मोहीम राबवली आणि अनेक गावांमध्ये मंदिरांचं बांधकाम केलं. गावात प्रसिद्ध असलेल्या अवसरे महाराजांचं १९ मार्च १९९२ रोजी निधन झालं. तो दिवस होळीचा होता. शोकसागरात बुडालेल्या गवराळा ग्रामस्थांनी त्या दिवसापासून होळी साजरी न करण्याचा निर्णय घेतला. होळीच्या दिवशी लाकडांची होळी न पेटवता गावाची स्वच्छता करून गोळा केलेल्या कचऱ्याची होळी पेटते. गावातल्या कचऱ्यासोबत वाईट विचारदेखील जाळले आहेत, असा गावकऱ्यांचा समज आहे.*

**<><><><><>**

होळी आणि उद्या होणाऱ्या धुळवडीच्या सणाच्या पार्श्वभूमीवर पश्चिम रेल्वेने काही प्रमुख रेल्वे स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकीटाच्या विक्रीला तात्पुरती बंदी घातली आहे. पश्चिम रेल्वेने अधिकृत पत्रकाद्वारे या बंदीविषयी कळवलं असून येत्या १६ मार्च पर्यंत ही बंदी लागू असेल. यात मुंबई सेंट्रल, वांद्रे टर्मिनस, वापी, वलसाड, उधना आणि सूरत या स्थानकांचा समावेश आहे. यात ज्येष्ठ नागरिक, महिला किंवा विशेष मदतीची आवश्यकता असणाऱ्या प्रवाशांच्या सोबतीला आलेल्या व्यक्तींना सूट दिली जाणार आहे.

**<><><><><>**

जागतिक पातळीवर माध्यम आणि मनोरंजन उद्योगात भारत आघाडीवर असल्याचं प्रतिपादन परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी आज नवी दिल्लीत केलं. वेव्हज अर्थात वर्ल्ड ऑडियो व्हिज्यूअल ॲण्ड एंटरटेनमेंट परिषदेच्या पार्श्वभूमीवर आज नवी दिल्लीत जागतिक समुदायासाठी एका विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी परिषदेच्या आयोजनासाठी केंद्र आणि राज्य सरकारमध्ये सामंजस्य करार करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थित होते.

वेव्हज हे माध्यम आणि मनोरंजन उद्योगात सुरू असलेल्या मोठ्या संक्रमणाचे प्रतिबिंब असल्याचं प्रतिपादन माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी यावेळी केलं. पारंपरिक माध्यमांचं नाविन्यपूर्ण माध्यमांशी एकत्रीकरण झाल्यामुळे स्पर्धा आणि सहकार्याची भावना निर्माण झाल्याची भावना माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यांनी यावेळी व्यक्त केली. या कार्यक्रमाचा उद्देश वेगाने वाढणाऱ्या माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रासाठी एक जागतिक व्यासपीठ बनवणं हा आहे. या कार्यक्रमात शंभराहून अधिक राजदूत आणि उच्चायुक्तांनी सहभाग घेतला होता.

<><><><><>

राज्यातल्या प्रत्येक टोल नाक्यावर फास्टॅगचा वापर अनिवार्य करणं आणि रोख पैसे दिल्यास दुप्पट शुल्क आकारणं हा राज्य सरकारचा धोरणात्मक निर्णय असल्याचा निर्वाळा आज मुंबई उच्च न्यायालयाने दिला. त्यामुळे या निर्णयात हस्तक्षेप करणार नसल्याचं म्हणत न्यायालयाने फास्टॅग सक्तीच्या निर्णयाला आव्हान देणारी जनहित याचिका फेटाळली आहे.

<><><><><>

राज्यात शनिवारपासून गाय आणि म्हशीच्या दूध दरात प्रतिलिटर दोन रुपयांनी वाढ होणार आहे. दूध उत्पादक आणि प्रक्रिया कल्याणकारी संघाच्या सभासदांची बैठक आज कात्रज डेअरीमध्ये घेण्यात आली. त्यामध्ये एकमताने हा निर्णय झाला. राज्यात या निर्णयाची अंमलबजावणी शनिवारपासून होणार आहे. या निर्णयानुसार प्रतिलिटर गायीच्या दुधाची विक्री 56 वरून 58 रुपये, तर म्हशीच्या दुधाची विक्री 72 वरून 74 रुपये होणार आहे. अशी माहिती दूध उत्पादक आणि प्रक्रिया कल्याणकारी संघाचे

अध्यक्ष गोपाळराव म्हस्के आणि मानद सचिव प्रकाश कुतवळ यांनी आज पुण्यात दिली.

**<><><><><>**

नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आर्थिक स्थितीत सुधारणा व्हावी यासाठी  राज्य सरकारने ‘प्राधिकृत अधिकारी’ म्हणून काल महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेची नेमणूक केली आहे. ‘सहकारान्तर्गत सहकार’ घडवणारा अशा तऱ्हेचा प्रयोग प्रथमच केला गेला आहे. राज्य सहकारी बँकेच्या सर्व संसाधनांचा उपयोग करून नागपूर जिल्हा बँकेला पुन्हा एकदा सक्षम बनवता येईल असा विश्वास राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी व्यक्त केला आहे. राज्य सहकारी बँकेचे प्रशासक, येत्या गुढीपाडव्याला प्राधिकृत अधिकाऱ्यांचा कार्यभार अधिकृतरीत्या स्वीकारतील असं बँकेच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

हरयाणातल्या पानिपत इथल्या काला अंब परिसरात मराठा शौर्य स्मारक उभारण्यासाठी लवकरच जमीन अधिग्रहण प्रक्रिया सुरू होणार असल्याची माहिती राज्य सरकारचे पणन आणि राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी दिली. या प्रकल्पासाठी हरयाणा राज्य सरकारशी समन्वय साधण्यासाठी रावल हे समन्वयक म्हणून काम पाहणार आहेत. जमीन अधिग्रहणाचं काम महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत केलं जाणार आहे. कालाअंब इथं छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारला जाणार आहे, तसंच मराठा शौर्याचं प्रतीक असणारं संग्रहालय, दृकश्राव्य

कार्यक्रम आणि अन्य आवश्यक सुविधा निर्माण केल्या जातील, अशी माहिती सांस्कृतिक कार्यक्रम मंत्री आशिष शेलार यांनी दिली.

<><><><><>

मुंबईतल्या विरार उपनगरात सोमवारी एका शिक्षिकेच्या घराला लागलेल्या आगीत वाणिज्य शाखेच्या इयत्ता १२ वी च्या उत्तरपत्रिकांचा गठ्ठा जळून खाक झाला. शिक्षण मंडळाच्या नियमानुसार या उत्तरपत्रिका महाविद्यालयातच तपासणं बंधनकारक असताना या शिक्षिकेनं उत्तरपत्रिकांचा गठ्ठा घरी आणला होता. पोलीस या घटनेची सखोल चौकशी करत आहेत.

<><><><><>

महिलांच्या प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेच्या एलिमिनेटर अर्थात उपांत्य फेरीत आज मुंबईत ब्रेबॉर्न मैदानावर मुंबई इंडियन्स संघाचा सामना गुजरात जायन्ट्स बरोबर सुरु होत आहे. गुजरातच्या संघानं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. मुंबई संघाची धुरा हरमनप्रीत कौर हिच्यावर तर गुजरात संघाची धुरा बेथ ॲशले गार्डनर हिच्यावर आहे.
या सामन्यातल्या विजेता शनिवारी अंतिम सामन्यात दिल्ली कॅपिटल्स विरोधात खेळेल.

<><><><><>

येत्या २४ तासांत राज्यभरात हवामान कोरडं राहील तर विदर्भात उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

<><><><><>

पोलीस विभागातील जातीय द्वेष मिटविण्यासाठी बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी अनोखी संकल्पना राबवली आहे. बीड जिल्हा पोलीस दलातील कर्मचाऱ्यांना आता आडनावाऐवजी पहिल्या नावानं ओळखलं जाणार आहे. या कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या नावाच्या पाट्यांवर आडनावाऐवजी पहिलं नाव असणार आहे.

**<><><><><>**

मुंबईतल्या रेडिओ क्लब जवळच्या प्रवासी जेट्टी तसंच टर्मिनल इमारतीचं भूमीपूजन राज्याचे बंदर विकास मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते झालं. या प्रस्तावित जेट्टीमुळे गेट वे ऑफ इंडिया इथल्या जेट्टीवरील ताण कमी होण्यास मदत  होईल, असं ते यावेळी म्हणाले.

**//<><><><><>//**